**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मलावीचे राष्ट्राध्यक्ष लाझारस चकवेरा यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा

- झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागा जाहीर

- मतदार याद्यांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करत श्वेतपत्रिका काढण्याची महाविकास आघाडीची निवडणूक आयोगाकडे मागणी

- बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीत वैयक्तिक कायद्यांच्या माध्यमातून अडथळे आणता येणार नसल्याचं सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट

**आणि**

- न्यूझीलंड विरुद्धच्या कसोटी सामन्यात दुसऱ्या डावात भारताच्या ३ बाद २३१ धावा, विराट कोहलीनं ओलांडला कसोटीत ९ हजार धावांचा टप्पा

**<><><><><>**

अफ्रिकेच्या तीन देशांच्या दौऱ्यादरम्यान, आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज मलावीचे राष्ट्राध्यक्ष लाझारस चकवेरा यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी शिष्टमंडळ स्तरावरील चर्चेनंतर भारत आणि मलावी यांच्यात चार सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. भारतानं मलावीला एक हजार मेट्रिक टन तांदूळ आणि भाभाट्रॉन कर्करोग उपचार मशीन सदिच्छा भेट म्हणून दिलं आहे. राष्ट्रपतीनीं मलावीमध्ये कायमस्वरूपी कृत्रिम अवयव प्रत्यारोपण केंद्र निर्माण करण्याची घोषणा केली.

दरम्यान उद्या राष्ट्रपतींच्या दौऱ्याचा समारोप होणार असून राष्ट्रपती मलावीहून नवी दिल्लीला रवाना होणार आहेत. राष्ट्रपती उद्या श्री राधा कृष्ण मंदिर आणि मलावी तलावाला भेट देणार आहेत.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीचं राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागा आज जाहीर झालं. एकूण ८१ जागांपैकी ६८ जागा भारतीय जनता पार्टी, १० जागा अखिल झारखंड स्टुडंट्स युनियन, २ जागा संयुक्त जनता दल आणि १ जागा चिराग पासवान यांचा लोक जनशक्ती पक्ष लढवणार आहे.
इंडिया आघाडीचं जागावाटप अजून जाहीर झालेलं नाही. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी झारखंड मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष हेमंत सोरेन यांची रांची मध्ये भेट घेतली. काँग्रेस नेते राहुल गांधी उद्या येणार आहेत.

पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरू झाली. या टप्प्यात ४३ जागांवर मतदान होणार आहे.

<><><><><>

आसाम आणि बिहारमध्ये विधानसभेच्या पोटनिवडणुकीची अधिसूचना आज जारी करण्यात आली. आसामध्ये विधानसभेच्या पाच जागांसाठी आणि बिहारमध्ये विधानसभेच्या चार जागांसाठी पोटनिवडणुक होत आहे.

<><><><><>

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सुरू असलेल्या गैरप्रकारांची दखल निवडणूक आयोगानं घ्यावी आणि मतदार याद्यांमधल्या अनियमिततेबद्दल श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केली आहे. आघाडीच्या घटक पक्षांच्या नेत्यांनी आज मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांची भेट घेतली आणि त्यांना यासंदर्भात

निवेदन दिलं. तसंच विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी निवडणूक आयोगालाही या संदर्भात पत्र लिहिलं आहे. पराभवाची भीती वाटत असल्यानं महाविकास आघाडीच्या समर्थकांची नावं मतदार याद्यांमधून वगळण्यासाठी अर्ज क्रमांक ७ आणि ८ मध्ये फेरफार केल्याचा आरोपही महाविकास आघाडीनं भाजपावर केला आहे.

**<><><><><>**

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारविरोधात आचारसंहिता भंगाची तक्रार केली आहे. विधानसभा निवडणुकीची घोषणा होऊन आचारसंहिता लागल्यानंतरही सरकारनं आपल्या शासकीय संकेतस्थळावर एका दिवसात २५९ शासन निर्णय प्रसिद्ध केले. तसंच २७ महामंडळांवर अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या. यामुळे आचारसंहितेचा भंग होत असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे. आचारसंहिता भंग करणाऱ्या या प्रकरणांची चौकशी करण्यात यावी, असं पत्र दानवे यांनी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त तसंच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर केलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार दीपक साळुंखे आणि भाजपाचे माजी आमदार राजन तेली यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. भाजपाचे नेते सुरेश बनकर यांनीही आज पक्ष प्रवेश केल्याची माहिती मुंबई इथं उद्धव ठाकरे यांनी दिली. आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते माजी नगरसेवक नाना बागुल तसंच सिंधी समाजाचे ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा यांनी आज रिपाई अर्थात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आठवले गटात प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेसनं आमदार सतीश चव्हाण यांना सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे. जाणीवपूर्वक पक्षविरोधी भूमिका घेतल्यामुळे आणि पक्षशिस्त मोडल्याबद्दल ही कारवाई केल्याचं प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

एमआयएमचे नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी नांदेड लोकसभा पोटनिवडणूक लढवण्याचा मानस व्यक्त केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं प्रसार माध्यमांशी बोलत होते. पक्षश्रेष्ठींनी आदेश दिला तर नांदेड इथून निवडणूक लढवणार असल्याचं, सय्यद इम्तियाज यांनी सांगितलं.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या नाशिक जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीत वैयक्तिक कायद्यांच्या माध्यमातून अडथळे आणता येणार नाहीत, असं सर्वोच्च न्यायालयाने आज स्पष्ट केलं. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या पीठानं आज बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्वंही जारी केली. बालविवाह रोखण्याच्या उद्देशाने या कायद्याची अंमलबजावणी केली जाते. त्यामुळे अल्पवयीन मुलांच्या अधिकारांचं संरक्षण यालाच प्राधान्य असून वैयक्तिक कायदे या अंमलबजावणीत अडथळे म्हणून आणता येणार नाहीत, असं सरन्यायाधीश यावेळी म्हणाले.

<><><><><>

सर्व भारतीय भाषांमध्ये  सुलभ आणि सोयीस्कर शिक्षणाला चालना देण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी

सांगितलं. त्यांनी आज नवी दिल्लीत प्राकृत, पाली, मराठी, बंगाली आणि आसामी या पाच नवीन अभिजात भाषांच्या अभ्यासकांशी संवाद साधला. भारतीय भाषा समितीचे अध्यक्ष चामू कृष्ण शास्त्री आणि यूजीसीचे अध्यक्ष एम. जगदीश कुमार यांच्यासह शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक आणि शिक्षण मंत्रालयाचे अधिकारीही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><>

आम आदमी पार्टीचे नेते आणि दिल्लीचे माजी कॅबिनेट मंत्री सत्येंद्र जैन यांना दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टानं आज मनी लाँड्रिंग प्रकरणात जामीन मंजूर केला आहे. जैन यांचा संबंध असलेल्या चार कंपन्यांद्वारे मनी लाँड्रिंग केल्याच्या आरोपाखाली त्यांनी ईडीनं ३० मे २०२२ रोजी अटक केली होती.

<><><><>

जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा दलांनी आज पुंछ जिल्ह्यात दहशतवादी कारवायांशी संबंधित असलेल्या एका व्यक्तीला अटक केली आहे. संशयिताकडून चार ग्रेनेड जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पूंछ शहर आणि सुरनकोट शहरात झालेल्या दोन ते तीन ग्रेनेड हल्ल्यांशी या व्यक्तीचा संबंध असल्याचा पुंछ पोलिसांना संशय आहे. हल्ल्यानंतर या भागात सुरक्षा उपाय आणि शोधमोहीम वाढवण्यात आली आहे. संशयिताच्या अटकेमुळे हल्ल्यांशी आणखी दहशतवादी संबंधाचा शोध घेण्यासाठी तपास सुरु आहे.

<><><><>

बंगळुरू इथल्या चिन्नास्वामी मैदानावर सुरू असलेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेटच्या पहिल्या सामन्याच्या आजच्या तिसऱ्या दिवशी भारतानं दुसऱ्या डावात ३ बाद २३१ धावा केल्या आहेत. न्यूझीलंडकडे पहिल्या डावानंतर सध्या १२५ धावांची आघाडी आहे. कालच्या दिवशी भारताचा पहिला डाव ४६ धावांवर आटोपल्यानंतर न्यूझीलंडने पहिल्या डावात ४०२ धावा करत भारतासमोर ३५६

धावांची आघाडी घेतली होती. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताकडून विराट कोहली आणि सरफराज खान यांनी प्रत्येकी ७० धावा तर रोहित शर्मानं ५२ धावा करत आजचा डाव सावरला. न्यूझीलँडच्या एजाज पटेल याने २ तर ग्लेन फिलिप्स याने १ गडी बाद केला.

दरम्यान या सामन्यात भारतीय फलंदाज विराट कोहली हा नऊ हजार कसोटी धावा करणारा चौथा भारतीय फलंदाज ठरला आहे. यापूर्वी सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांनी ही कामगिरी केली आहे.

**<><><><><>**

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताची बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधूला महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया मारिस्का तुनजुंगकडून पराभव पत्करावा लागला. मारिस्का तुनजुंगने सिंधूचा १३-२१, २१-१६, ९-२१ असा पराभव केला.

**<><><><><>**

भारतातल्या रासायनिक तसंच पेट्रोलियम क्षेत्रातल्या रसायनांच्या उत्पादनांची बाजारपेठ पुढच्या वर्षी ३०० अब्ज डॉलरपर्यंत पोचेल असा ठाम विश्वास खनिज तेल मंत्री हरदीप पुरी यांनी आज दिल्ली इथं व्यक्त केला.

**//<><><><><>//**